आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१८ मे २०२६ - सोमवार

**ठळक बातम्या**

- विधानपरिषदेच्या १६ जागांसाठीच्या द्वैवार्षिक निवडणुकीचं वेळापत्रक जाहीर; १८ जूनला मतदान आणि २२ जूनला मतमोजणी होणार

- नीट पेपरफुटीप्रकरणी ट्यूशन क्लास चालक शिवराज मोटेगावकर यांना पुण्यातून अटक

- पाच देशांच्या दौऱ्यादरम्यान प्रधानमंत्री नरेंद्र मोदी नॉर्वेला पोहोचले

**आणि**

- येत्या दोन दिवसात मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता; अकोल्यात एकाचा उष्माघाताने बळी

<><><><><>

केंद्रीय निवडणूक आयोगानं महाराष्ट्र विधान परिषदेच्या १६ जागांसाठीच्या द्वैवार्षिक निवडणुकीचं वेळापत्रक जाहीर केलं आहे. स्थानिक स्वराज्य संस्थामधून निवडून द्यायच्या सोलापूर, अहिल्यानगर, ठाणे, जळगाव, सांगली-सातारा, नांदेड, यवतमाळ, पुणे, भंडारा-गोंदिया, रायगड- रत्नागिरी- सिंधुदुर्ग, नाशिक, वर्धा- चंद्रपूर- गडचिरोली, अमरावती, धाराशिव- लातूर- बीड, परभणी- हिंगोली आणि छत्रपती संभाजीनगर- जालना या १६ मतदारसंघांमधल्या सदस्यांचा कार्यकाळ संपल्यानं  ही निवडणूक होणार आहे. यासोबतच चंद्रशेखर बावनकुळे हे विधानसभेत निवडून आल्याने त्यांनी विधान परिषद सदस्यत्वाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या एका जागेसाठीही  निवडणूक होणार आहे.

याबाबतची अधिसूचना येत्या २५ तारखेला जारी होईल. १ जूनपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील, तर ४ जूनपर्यंत उमेदवारी मागे घेता येईल. मतदान १८ जून रोजी होणार असून २२ जूनला मतमोजणी होईल. याबरोबरच संबंधित क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे.

<><><><><>

नीट यूजी पेपरफुटी प्रकरणी लातूर शहरातल्या रेणुकाई केमिस्ट्री क्लासेस चालवणाऱ्या शिवराज मोटेगावकर या संचालकाला सीबीआयने पुण्यातून अटक केली आहे. काल या

प्रकरणाच्या चौकशीत मोटेगावकर यांच्या मोबाईल फोनमध्ये नीट परीक्षेची फुटलेली प्रश्नपत्रिका सापडली. त्यामुळे आज अटकेची कारवाई करण्यात आली. या प्रकरणात सीबीआयने मोटेगावकर यांची ११ तास चौकशी केली. त्यानंतर त्यांच्या लातूर इथल्या प्रशिक्षण केंद्रात शोधमोहीम राबवून सीबीआयने संशयित दस्तऐवज, संगणक आणि मोबाईल फोन जप्त केले. या प्रकरणात सहभागी असणाऱ्या टोळीचे मोटेगावकर हे सक्रिय सदस्य असल्याचा संशय आहे. मोटेगावकर यांनी इतर आरोपींशी संगनमत करून २३ एप्रिल रोजी होणाऱ्या परीक्षेपूर्वी ही प्रश्नपत्रिका मिळवून अनेक जणांना दिली, असं सीबीआयनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

कांद्याचे भाव पडल्याच्या निषेधार्थ छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात वैजापूर इथं समृद्धी महामार्गावर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या कार्यकर्त्यांनी चक्काजाम आंदोलन केलं. यावेळी आंदोलकांनी रस्त्यावर टायर जाळलं तसंच रस्ता अडवला, त्यामुळे काही काळासाठी वाहतूक कोंडी झाली होती, असं प्रशासनाने सांगितलं. सरकारने योग्य दरात कांदा खरेदी करावा अशी मागणी आमदार अंबादास दानवे यांनी यावेळी केली.

**<><><><><>**

शंभर रुपयांच्या बनावट नोटा छापून त्या चलनात आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या नागपुरातल्या चौघा जणांना गडचिरोली पोलिसांनी आज अटक केली. पोलिसांनी त्यांच्याकडच्या ५०, १०० तसंच २०० रुपयांच्या काही बनावट नोटाही जप्त केल्या आहेत. या आरोपींपैकी एक जण स्थापत्य अभियंता असून एक जण यांत्रिकी अभियंता आहे. त्यांनी छापलेल्या बनावट नोटा एका पानटपरीवाल्याच्या माध्यमातून चलनात आणण्याचा प्रयत्न केल्याचं उघड झालं आहे. या आरोपींना ६ दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

**<><><><><>**

पाच देशांच्या दौऱ्यावर असणारे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज नॉर्वेची राजधानो ऑस्लो इथे पोहोचले. या दौऱ्यात भारत - नॉर्वे द्विपक्षीय संबंधांवर चर्चा होणार असून तिसरी भारत-नॉर्डिक शिखर परिषदही होणार आहे. भारतीय प्रधानमंत्र्यांचा गेल्या ४३ वर्षातला हा पहिलाच नॉर्वे दौरा आहे.

भारतीय समुदायानं पारंपरिक पोशाखात प्रधानमंत्री मोदी यांचं उत्साहानं स्वागत केलं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या स्वीडन दौऱ्यात गुटेनबर्ग इथं युरोपियन उद्योजकांसोबतच्या गोलमेज परिषदेला संबोधित केलं. गुंतवणूक, नवोन्मेष आणि उत्पादन यासाठी भारत हे जगातलं आकर्षक ठिकाण आहे, असं त्यांनी सांगितलं. ग्रीन हायड्रोजन मिशन, स्वच्छ ऊर्जा यासारख्या भारतातल्या महत्त्वाकांक्षी योजनांमध्ये सहभागी होण्याची मोठी संधी स्वीडनमधल्या अनेक कंपन्यांसाठी उपलब्ध असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. भारताची रिफॉर्म एक्सप्रेस पूर्ण गतीनं आगेकूच करत असून संस्थात्मक प्रणाली सारख्या उपाययोजनाही लवकरच केल्या जातील, असं आश्वासन त्यांनी दिलं. स्वीडनचे प्रधानमंत्री उल्फ क्रिस्टरसन आणि युरोपियन युनियनच्या अध्यक्षा उर्सुला फॉन डेर लेयन यावेळी उपस्थित होते.

प्रधानमंत्री  मोदी यांना द्विपक्षीय संबंधांमधल्या त्यांच्या योगदानाबद्दल आणि दूरदर्शी नेतृत्वाबद्दल रॉयल ऑर्डर ऑफ द पोलर स्टार कमांडर ग्रँड क्रॉस हा स्वीडनचा सर्वोच्च सन्मान प्रदान करण्यात आला.

**<><><><><>**

राज्यात कमाल तापमानात वाढ झाली आहे. येत्या दोन दिवसात मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

अकोला जिल्ह्यात उन्हाचा तडाखा दिवसेंदिवस तीव्र होत असून कमाल तापमानात सातत्याने वाढ होत आहे. या पार्श्वभूमीवर हवामान विभागाने अकोला जिल्ह्याला आज उष्णतेचा ऑरेंज अलर्ट दिला आहे. पुढचे काही दिवस कमाल तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता असून उष्णतेची लाट आणखी तीव्र होईल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.  वाढत्या तापमानामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेता प्रशासनाकडून सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान, अकोल्यात तेल्हारा तालुक्यातल्या पिंपरखेड इथे उष्माघातामुळे एकाचा मृत्यू झाला.

**<><><><><>**

केरळमध्ये संयुक्त लोकशाही आघाडीचे मुख्यमंत्री म्हणून काँग्रेसचे व्ही. डी. सतीशन यांनी आज शपथ घेतली. थिरुवनंतपुरममध्ये राज्यपाल राजेन्द्र आर्लेकर यांनी त्यांना पद

आणि गोपनियतेची शपथ दिली. सतीशन यांच्या सोबत वीस जणांनी मंत्रीपदाची शपथ घेतली. यामध्ये वरिष्ठ काँग्रेस नेते रमेश चेन्नीथला, के. मुरलीधरन, ए.पी अनिलकुमार तसंच केरळ प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष सनी जोसेफ यांचा समावेश आहे. मुस्लिम लीगचे पी. के. कुनहलीकुट्टी, आरएसपी नेते शिबू बेबी जॉन, केरळ काँग्रेसचे मॉन्स जोसेफ, केरळ काँग्रेस जेकबचे अनुप जेकब आणि सीएमपीचे सी.पी. जॉन यांनीही शपथ घेतली.

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, नेते राहूल गांधी तसंच प्रियांका गांधी वड्रा त्याचबरोबर काँग्रेसशासित राज्यांचे मुख्यमंत्री शपथविधीला उपस्थित होते. केरळचे माजी मुख्यमंत्री पिनराई विजयन यांच्यासह माकपचे आणि भाजपाचे नेतेही शपथविधीला उपस्थित होते.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशात लखिमपूर खेरी जिल्ह्यात आज सकाळी झालेल्या रस्ते अपघातात १० जणांचा मृत्यू झाला. ट्रकने समोरून येणाऱ्या प्रवासी वाहनाला जोराची धडक दिल्याने हा अपघात झाला. या वाहनात दहा जण प्रवास करत होते. अपघाताची तीव्रता इतकी होती की यातल्या ९ जणांचा जाग्यावर मृत्यू झाला. तर एकाचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला असून प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीमधून मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी दोन लाख रुपये मदत जाहीर केली आहे. तसंच जखमींना उपचारासाठी ५० हजार रुपये मदत देण्यात येणार आहे.

**<><><><><>**

सातारा इथं काल झालेल्या ५२ व्या हिंदकेसरी कुस्ती स्पर्धेचा किताब पैलवान महेंद्र गायकवाड यांनी पटकावला. महाराष्ट्र केसरी पैलवान पृथ्वीराज मोहोळच्या हाताला झालेल्या दुखापतीमुळं दुसऱ्या डावात महेंद्र गायकवाडला विजयी घोषित करण्यात आलं. त्यामुळं पूर्वी ३ वेळा उप-महाराष्ट्र केसरी किताब पटकावणारा महेंद्र गायकवाड यावेळी हिंद केसरी ठरला.

**<><><><><>**

आय पी एल क्रिकेट स्पर्धेत आज चेन्नईमधल्या चिदंबरम स्टेडिअमवर यजमान चेन्नई सुपर किंग्जचा मुकाबला सनरायझर्स हैदराबादशी होणार आहे. संध्याकाळी साडे सात वाजता सामन्याला सुरुवात होईल.

या स्पर्धेत सध्या १४ गुण मिळवून सनरायझर्स हैदराबाद तिसऱ्या स्थानावर आहे, तर चेन्नई सुपर किंग्ज १२ गुणांसह पाचव्या स्थानावर आहे.

**<><><><><>**

वारकरी संप्रदायातील टाळवादक ज्ञानेश्वर टाकळकर यांचं काल पुण्यात निधन झालं. संगीत क्षेत्रातील जवळजवळ चार पिढ्यांना लयबद्ध टाळ-साथ करणारे माऊली टाकळकर यांनी नुकतंच वयाच्या शंभरीत पदार्पण केलं होतं. पंडित भीमसेन जोशी आणि किशोरी आमोणकर यांच्यापासून आत्ताच्या तरूण कलाकारांनाही माऊली टाकळकर यांनी साथ केली.

**//<><><><><>//**